e-ISJN: A4372-3088
p-ISJN: A4372-3089

ISSN: 2394-3122 (Online)
ISSN: 2394-6253 (Print)
Impact Factor: 6.03

Volume 11, Issue 12, December 2024

SK International Journal of Multidisciplinary Research Hub

Journal for all Subjects

Research Article / Survey Paper / Case Study

Published By: SK Publisher

(www.skpublisher.com)

*A Monthly Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access Multidisciplinary & Multilingual International Journal*

Special Issue: National Interdisciplinary Conference on "Women Empowerment: Issues, Challenges and Solutions"

Organised by: Department of Political Science & I. Q. A. C., Shankarlal Khandelwal Arts, Science & Commerce College, Akola, Maharashtra 444002.

(Sponsored by PM-UShA Grants to Strengthen Colleges)

# *मानवी हक्क आणि प्रसार माध्यमांची भुमिका*

**सहा. प्रा. डॉ. उमेश आर. धुमाळे**
राज्यशास्त्र विभाग,
श्री नरसिंग महाविद्यालय, अकोट.

**DOI:** https://doi.org/10.61165/sk.publisher.v11i12.108

*सारांश: जगामध्ये मानवी हक्क ही सर्वात मोठी भेडसावणारी समस्या निर्माण झालेली आहे. लोकशाही व्यवस्थेमध्ये मानवी हक्कांचे संरक्षण व संवर्धन करण्याची जबाबदारी संविधानाने शासनाकडे सोपविलेली असते परंतु शासन व्यवस्था हे काम करू शकत नाही. कधी कधी शासना कडुन मानवी हक्कावर मर्यादा येवुन पडतात. अशा वेळी मानवी अधिकाराचे संरक्षण कसे करावे हा प्रश्न त्या ठिकाणी निर्माण होतो. अन्याया विरूध्द आवाज कुणी उठवायचा हा प्रश्न उपस्थित होतो. अशावेळी लोकशाही व्यवस्थेमध्ये चौथा आधारस्तंब ज्याला म्हणतात त्या प्रसारमाध्यमाकडे ही जबाबदारी येते. भारतामध्ये किंवा जगामध्ये प्रसारमाध्यमांनी अनेकवेळा मानवी अधिकारांचे रक्षण करण्यामध्ये अत्यंत महत्वाची भुमिका पार पाडलेली असते. नव्हे पार पडत आहे. मानवी हक्काचे संरक्षण केल्या गेले पाहिजे याकरीता विविध देशाच्या कायदेमंडळांनी सुध्दा कायदे तयार केलेले आहेत. त्यामुळे अनेक ठिकाणी आपल्याला मानवी अधिकाराचे उल्लंघन होत असतांना त्या ठिकाणी मर्यादा सुध्दा आलेल्या आहेत. लोकशाहीचे चौथे अंग म्हणुन प्रसार माध्यमांनी क्रांतीकारक भुमिका जर पार पाडल्या गेली तर निश्चितपणे मानवी अधिकाराचे उल्लंघन कमी होत असतांना आपल्याला निश्चितपणे दिसुन येईल.*

मनुष्य हा समाजशिल प्राणी आहे तो समाजाशिवाय आपली प्रगती साध्य करू शकत नाही म्हणुन मनुष्य हा राज्याचा प्रथम घटक आहे. त्या अनुषंगाने प्रत्येक मनुष्य हा आपल्या सभ्यतेचे अपत्य आहे आणि सामाजिक न्याय सर्वांना बंधनकारक आहे या दोन प्रबल वास्तविक विचार धारेतुन ' मानवी हक्क ' ही संकल्पना उदयाला आली या विचारामध्ये मानवता मानवी भावना आणि त्यांचे मन तसेच मुलभुत बाबींना महत्वाचे स्थान आहे. शांततेने व सुखाने जगण्याचा आणि आपले हक्क प्रतिष्ठेने उपभोगण्याचा मनुष्याला असणारा हक्क म्हणजे मानवी हक्क होय.

**मानवी हक्काची व्याख्या :**

मानवी हक्काचा अर्थ अनेक अभ्यासकांनी विचारांच्या आणि व्याख्यांच्या माध्यमातुन स्पष्ट केलेला आहे.

**१. डवार्किन :—**

'मानवी अधिकार हे मानवास मिळालेले असे हक्क आहे की, ज्यांचे सार्वजनिक हीतासाठी देखील राज्याकडुन उल्लंघन होवु शकत नाही आणि राष्ट्रीय कायद्याशिवाय ते उपभोगता येवु शकत नाही.

**२. मॅक्फरलेन :—**

''मानवी अधिकार हे असे नैतिक अधिकार आहेत की जे प्रत्येक स्त्रि पुरूषाला माणुसकी या नात्याने मिळालेले आहे''

**३. रॅन्डम हाऊस :—**

''मानवी हक्क म्हणजे व्यक्तीला जन्माने प्राप्त झालेले असे अधिकार जे व्यक्तीला सन्मानाने जगण्यासाठी आवश्यक असतात.''

मानवी अधिकार किंवा हक्क ही अशी एक मुलभुत संकल्पना आहे की व्यक्तींचा अधिकार त्या सोबत जुळलेला असतो यांचे रक्षण करण्यासाठी संविधान तर आहेच सोबतच कायदे सुध्दा आहेत. याबरोबरच प्रसारमाध्यमे ही सुद्धा एक लोकशाहीचे महत्वपुर्ण अंग आहे. प्रसारमध्यमे म्हणजे माहिती प्रसारीत करणारी माध्यमे म्हणजेच प्रचार माध्यमे असे म्हणतात. प्रसार माध्यमांचे प्रकार उदा वृत्तपत्रे, मासिके, नियतकालीके, पुस्तके, अहवाल त्याच बरोबर इलेक्ट्रॉनिक्स मिडीया उदा — रेडीओ, दुरदर्शन,इंटरनेट, टेलिफोन, मोबाईल ई असल्याचे दिसुन येते. मानवी हक्काच्या जागतीक जाहीरनाम्यातील १९ व्या

*© 2024, SK Publisher All Rights Reserved*

SK International Journal of Multidisciplinary Research Hub
Volume 11, Issue 12, December 2024 pg. 557-559

कलमाने प्रत्येकाला विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले आहे त्यामुळे कोणत्याही दबावाशिवाय आपले मत व्यक्त करणे तसेच कोणत्याही माध्यमातुन माहिती देणे — घेणे कींवा मिळवणे हा प्रत्येकाचा हक्क आणि अधिकार आहे. लोकशाहीमध्ये प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य व्यक्तीला मुलभुत हक्क म्हणुन मान्य केल्यामुळे मुलभुत हक्क म्हणुन मान्य केल्यामुळे प्रसारमाध्यमांना कायद्याचे संरक्षण प्राप्त झाले आहे.

**राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाचे प्रसार माध्यमांसाठी मार्गदर्शक नियम**

१. लैंगीक अत्याचार हा लहान मुलांसाठी क्लेषदायक अनुभव असतो त्याबरोबरच या प्रकरणांची माध्यमांनी संवेदनशिलपणे हाताळणी केली पाहीजे.

२. तसेच कोणताही विषय अत्यंत शांततेने हाताळल्या गेला पाहिजे.

३. अन्याय झालेल्या पीडीताचा त्याची ओळख इतरांना होवु नये या करीता काळजी घेतली गेली पाहीजे.

४. लहान मुलांच्या लैंगीक शोषणांच्या वृत्तांकडे प्रसार माध्यमांनी लक्ष वेधले पाहीजे.

५. अन्याया विरूध्द झालेली कार्यवाही सामाजिक संस्थांचे कार्य याचा प्रसार व जागृती झाली पाहीजे.

६. बालहीताच्या दृष्टीकोणातुन याचा वाईट परिणाम होणार नाही याची दक्षता घेतल्या गेली पाहीजे.

**प्रसार माध्यमांची भुमिका**

लोकशाही व्यवस्थेमध्ये प्रसार माध्यमांनी पारदर्शक भुमिका पार पाडणे आवश्यक असते

१. दुरदर्शन व रेडीओ यांसारख्या माध्यमातुन प्रसारीत होणाऱ्या कार्यक्रमातुन महिला, अपंग, वृध्द तसेच समाजातील उपेक्षीत घटक यांच्या हक्काची माहिती देवुन जनतेत जागृती निर्माण होते.

२. प्रसार माध्यमांनी शोषीत व पीडीत स्त्रियांचे प्रश्न सातत्याने मांडलेले आहेत. त्यांच्यावरील अन्यायाला वाचा फोडलेली आहे. उदा. दिल्लीतील निर्भया प्रकरण तसेच २०२४ मधील कलकत्ता येथील महिला डॉक्टर हत्याकांड.

३. बालकांसाठी प्रसार माध्यमातुन काही महत्वपुर्ण योजनांची जाहीरात केली जाते उदा. लसिकरण योजना,पोषन आहार योजना, आरोग्य विषयक सुविधा तसेच गणवेश विषयक सुविधा, आरोग्यविषयक जागृती, एडस प्रतिबंधक उपाय यांचा प्रसार होवुन आरोग्य सुधारण्यास त्या ठिकाणी मदत होते.

४. आदिवासी, दलीत, उपेक्षीत यांच्यावर झालेल्या अत्याचारांना माध्यमांनी प्रसिध्दी दिल्या नंतर त्याची गंभीर दखल घेणे शासनाला भाग पडते.

५. मुलिंच्या जन्माचे स्वागत व्हावे म्हणुन दुरदर्शन, आकाशवाणी या प्रसारमाध्यमांद्वारे कायद्याचा व मुलींच्या जन्माच्या स्वागत मोहिमेचा प्रसार करण्यात येतो.

**प्रसारमाध्यमांचे कार्य व भुमिका :**

१. जनतेत मानवी हक्काबाबत आदर निर्माण करणे आणि माहितीचा प्रसार करणे.

२. व्यक्तीगत पातळीवर माध्नवी हक्काच्या उल्लंघनाविरूध्द लढा देणे.

३. पिडीत व्यक्तींना मदत करणे.

४. मानवी हक्क पालनाचा स्तर व आदर्श उंचावण्यासाठी सामान्य जनतेला एक व्यासपिठ देणे.

५. मानवी हक्काच्या संदर्भात केलेल्या कायद्याचा संदर्भ घेवुन मानवी अधिकाराचे रक्षण करण्यात महत्वपुर्ण भुमिका पार पाडणे.

थोडक्यात लोकशाही व्यवस्थेत प्रसारमाध्यमांची भुमिका संसद,प्रशासन आणि न्यायव्यवस्था यांच्या प्रमाणे महत्वाची आहे. व्यक्तीची प्रतिष्ठा,स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही मुल्ये जनमाणसात रूजवण्याचे काम प्रसार माध्यमे करत असतात. प्रसार माध्यमे ही दुधारी शस्त्र असल्यामुळे यांचा वापर सद्सद विवेक बुध्दीने करावा हीच अपेक्षा असते.

कायद्याचे राज्य निर्माण होण्यासाठी सहिष्णुता आणि जबाबदारी अहिंसा यास प्रेरीत करण्याच्या दृष्टीकोणातुन प्रसार, प्रचार माध्यमांनी आपली भुमिका न्याय पुर्ण पध्दतीने पार पाडणे लोकशाही व्यवस्थेमध्ये महत्वाचे असते.

**संदर्भसुची**

१. डॉ बाबासाहेब आंबेडकर : भारतीय संविधान

| | | | |
|---|---|---|---|
| २. | शिरूरकर देवेंद्र | : | मानवी हक्क म्हणजे काय ? |
| ३. | आशा कौशिक | : | मानवाधिकार और राज्य बदलते संदर्भ उभरते आयाम |
| ४. | प्रा.भालेराव सुरेश | : | मानवी हक्क सद्यस्थिती व आव्हाने. |
| ५. | प्रा. थोरवे शैला | : | भारतीय राज्यघटना |
| ६. | आशा गवई | : | महिलांच्या मानवी अधिकाराचे उल्लंघन |
| ७. | डॉ संजय सिंह | : | संविधान और मानवाधिकार |
| ८. | यादर रामजी | : | सामाजिक समस्याऐ |
| ९. | प्रा. संजय खंडारे | : | भारतीय राज्यघटना |
| १०. | मिश्रा दामोदर | : | मानवाधीकार दशा और दिशा |

:::. Cite this article .:::

धुमाळे, सहा. प्रा. डॉ. उमेष आर. (2024). मानवी हक्क आणि प्रसार माध्यमांची भुमिका. SK International Journal of Multidisciplinary Research Hub, 11(12), 557–559. https://doi.org/10.61165/sk.publisher.v11i12.108